त्यातही माध्यमांमधील स्त्रीची प्रतिमा ही कायम वादातील राहीली आहे. एकीकडे भारतीय संस्कृती जपणारी, कुटुंबाची काळजी घेणारी, प्रत्येकाला आधार देणारी आणि प्रसंगी दुर्गा होणारी अशी स्त्री दाखवली जाते दुसरीकडे त्याच देहाचे उत्तान प्रदर्शन सौंदर्याच्या नावाखाली केलं जातं माध्यमांचा हवढा पगडा आपल्या मनावर इतका जबरदस्त आहे की या दोन टोकाच्या भूमिकांमध्ये आपली भारतीय स्त्री अडकली आहे. या सगळ्याचा परिणाम तिच्या वैयक्तिक आणि सामाजिक आयुष्यावर होत असतो. या खोट्या स्त्री-प्रतिमेला भेदून बाहेर पडलेलीच स्त्री आयुष्यामध्ये काही करुन शकते. पण हा लढा तेवढा सोपा नसतो आणि असे संघर्ष माध्यमं कधीच दाखवत नाहीत.

भारतामध्येही परिस्थिती यापेक्षा वेगळी नाही. प्रत्येक माध्यमांचा स्वतंत्रपणे विचार केला तरी स्त्रीयांचं केलं जाणारं चित्रण आक्षेपार्हच वाटतं.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

चाकोरी सोडून स्त्रीच वेगळं अस्तित्व मान्य करण्याच दृष्ट्या माध्यमं फारच कमी करतात. कारण त्यात बहुसंख्य माध्यमांचा फायदा नसतो. पुरुष प्रधान संस्कृतीमध्ये स्त्रियांच्या दुय्यम स्थानाबद्दल अनेकदा बोलल जातं, लिहील जात. अगदी या विषयावर सि चित्रपटही आले आहेत. पण त्यांची संख्या हातच्या बोटावर मोजण्या इतकी असेल. जे सातत्याने लोकांच्या मनात बिंबवलं जातं ते स्त्रियांबद्दल गैरसमज प्रसरवणारं त्यांची चुकीची प्रतिमा दाखवणारंच असत. त्याचा परिणाम स्त्री मनावर एवढा खोलवर होतो. की त्या चुकिच्या प्रतिमेत बसण्याची चडपड काही बायका आयुष्यभर करत राहतात आणि स्वतःचं स्वतं अस्तित्व हरवून बसतात.

90 च्या दशकामध्ये टीव्हीची लोकप्रियता वाढल्यावर आणि भरमसाठ चॅनल सुरू झाल्यावर कौटुंबिक मालिकांची एक लाट आली. ती अजूनही कायम आहे. त्या सगळ्यांची एक थीम कायम असते की. एक स्त्री अत्यंत सज्जन, गुणी, सुस्वभावी आणि तिला त्रास देणारी दुसरी बाई कारस्थानी, कपटी. दुष्ट. अशी या भीमभोवती मग घरातली भांडणं, रुसवे फुगवे, लग्नं - कार्य. अशा गोष्टी येत राहतात. या सगळ्यामध्ये बायकांचा भर हा चांगलं दिसणं त्यासाठी खूपसारा मेकअप करणं, भरजरी साड्या नेसणं, यावर अधिक असतो. अगदी स्वयंपाक करताना आणि शोपताना

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

मेकअप आणि भरजरी साडीशिवाय बायका दिसत नाहीत. तसंच त्या दिवसभर स्वयंपाक करताना आणि जेपतानाही.. कारस्थान करतात किंवा अन्याय सहन करतात. एखादी आर्थिक दृष्ट्या स्वतंत्र जोखीम करणारी महिला असेल तर तिची चांगली प्रतिमा दाखवण्यासाठी तिला कारस्थानी दाखवण्यावर भर असतो. महिलांची सहनशक्ती हा अभ्यासून आधिक मालिकांचा विषय असतो. नवरा दारू विणारा, माइंडेड करणारा, दुसऱ्या बाईशी संबंध ठेवणारा, काम धंदा न करणारा, ~~दुसऱ्या~~ गुन्हेगार असा कसाही असला तरी चालेल. बाईने ते सहन करायचं आणि त्या नवऱ्याच्या मागे उभं रहायचं. मग 'सब्र का फल मिठा होता है' प्रमाणे काही वर्षांनी तो सुधारतो आणि चांगला होतो. केवळ बायको, मुलगी, आई या पलीकडे जाऊन तिला एक माणूस म्हणून दर्जा देण्यामध्ये या मालिका कमी पडतात. या मालिकांना टीआरपी मोठा असला आणि त्यांचा चाहता वर्गही मोठा असला, आणि त्यांच्या त्यांच्या महिलांची प्रतिमा काही बदलत नाही. खरं आयुष्य जगताना महिलांना टीआरपी मोठा असला आणि त्यांचा चाहता वर्गही मोठा असला आणि त्यांचा चाहता वर्गही मोठा असला, तरी महीलांची प्रतिमा काही बदलत नाही. खरं आयुष्य जगताना महिलांना कशा लागणारा संघर्ष त्यात जवळजवळ नसतोच

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

एखादी स्त्री-प्रधान मालिका असलीच तर त्यातही ती बाई पुरुषांचं अनुकरण करत इतरांवर दादागिरी करणं, एककल्ली निर्णय घेऊन ते इतरांवर लादणं, चुका करणाऱ्यांना शिक्षा देणं अशाच गोष्टी करताना दाखवतात. स्त्री म्हणून आपलं वेगळं अस्तित्व तिला दिलंच जात नाही. केवळ कौटुंबिक आणि भावनिक जाळ्यात अडकलेल्या तोच तोच पणा असणाऱ्या या मालिकांमध्ये क्वचितच मानवी मूल्यांची जपणूक केली जाते. स्त्रियांच्या विविधरंगातही दुजाभाव असतो. मध्यमवर्गीय, उच्चमध्यमवर्गीय महिलांच्या भूमिका जास्त दिसतात. गरीब कष्टकरी महिलांना त्यामध्ये अगदीच कमी स्थान दिल जातं. आभासी जग सगळ्यांना आवडतं. काही स्वप्नही प्रत्येक जण बघतो. पण केवळ अशक्यप्राय असलेल्या गोष्टीच सातत्याने दाखवल्या तर त्याही खऱ्या वाटायला लागतात. भारतीय टीव्ही मालिकांच तसं कादीस आहे. आभासी जगाला खरं भासवण्याचा अटोकाट प्रयत्न केला जातो आणि त्यात भरडली मात्र बाई जाते. थोडक्यात काय तर यातून एकच संदेश मिळतो की प्रत्येक बाईने घरच्या चौकटीत रहावं, नव्या नवऱ्यांचं, वडिलधाऱ्यांच एकावं आणि आपली बुद्धी मात्र वापरू नये. तिला खायला प्यायला मिळेल. उत्तम दागिने-कपडे मिळतील. पण तिने स्वतःचं अस्तित्व शोधायच्या भानगडीत पडू नये.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

दुसऱ्या बाजूला डीव्ही मालिकांच्या खालोखाल जाहिराती दाखवल्या जातात आणि त्याही तितक्याच लोकप्रिय होतात. पण त्यात दाखवली जाणारी स्त्रीची प्रतिमा मला अगदी अचानक वाटले एका जाहीरातीत दाखवली आई सकाळी प्रत्येकाच्या आवडीचा चार ते पाच प्रकारचा नाश्ता बनवून देताना दाखवली आहे. त्यासाठी तिला हे सहा हात दाखवले आहेत. प्रत्यक्षात प्रत्येकाच्या आवडीचे पदार्थ रोज बनवत राहिले तर ती आई त्यासाठी स्वयंपाक घरच्या कधी बाहेर पडूच शकत नाही. कपड्यांच्या पावडरच्या बहुसंख्य जाहिरातींमध्ये महिला हातानेच धारून धारून कपडे धुताना दाखवतात जेव्हा आज बहुतेक मध्यमवर्गीय घरांमध्ये मशीन असतं. औषधांच्या अनेक जाहीरातींमध्ये कितीही डोके दुखत, अंग दुखत तब्येत बिघडली तरी केवळ एक औषधांची गोळी घेऊन ती बाई एकदम उठाठणीत होते आणि लगेच घरच्या कामाला लागते. नोकरी करणारी एखादी स्त्री असली तरी ती गृहकृत्यदक्ष असायला हवी हे जाहिराती वारंवार समाजाच्या मनावर बिंबवतात. घर, नोकरी, मूल, सासू - सासरे, नवरा यांच्या प्रत्येकाच्या गरजा पूर्ण करणारी 'सुपर वुमन' या जाहीरातींमधून दाखवतात. प्रत्यक्षात सुपर वुमन नसतात त्या केवळ एक माणूस असतात. पण या जाहिरातींच्या प्रभावाखाली आलेल्या प्रत्येकाला आपली आई, बायको, मुलगी अशीच असावी असं वाटतं.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

कुटुंबाच्या प्रेमापोटी त्या त्याग करतात, मेहनत करतात, आवड म्हणूनही अनेक गोष्टी करतात. पण त्यांच्यावर अमानवी अपेक्षा लादणं अत्यंत चुकीचं आहे. कारण त्या अपेक्षा पूर्ण न झाल्याने अनेक महिलांना आलेले नैराश्य हे भयंकर असतं.

जाहिरातींमध्ये आणखी एक मोठा भाग हा सौंदर्यप्रसाधनांचा असतो. गोरं दिसणारी, दाट-मऊ आणि काळे केस असणारी, बारीक बांध्या असणारीच मुलगी सौंदर्यवान समजली जाते. गोरा रंग मिळवण्यासाठी फेअरनेस क्रीम्स, जाडी कमी करण्यासाठी कसली कसली औषधं-गोळ्या आणि डाएट, केस लांबसडक मऊ दिसण्यासाठी वेगवेगळे शॅम्पू या गोष्टी स्त्रियांच्या जीवनाचा अविभाज्य भाग झाल्या आहेत. वाढत्या वयानुसार शरिरात, चेहऱ्यात होणारे बदल स्वीकारण्याऐवजी जाहिराती बघून प्रत्येक बाईने तरुणच राहिलं पाहिजे अशी सातत्याने अपेक्षा केली जाते. या सौंदर्याच्या ओझ्याखाली ती इतकी दबून गेली आहे की जाहिरातीतल्या मॉडेलप्रमाणे दिसण्यासाठी ती जीवाचा आटापिटा करते. सध्या विशिष्ट दिसण्यासाठी कॉस्मेटिक सर्जरीचा धंदा जोरात सुरू आहे. भारतामध्ये कॉस्मेटिक सर्जरी करून घेणारे मोकळेपणाने बोलत नसले तरी पश्चिमात्य जगामध्ये मात्र मॉडेल्स, अभिनेत्री याबद्दल बिनधास्तपणे बोलून टाकतात.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

कदाचित तोही त्यांच्या व्यवसायाची लोकप्रियता वाढवण्याचा भाग असेल पण एका टप्प्यावर येऊन कादीजणी हे नक्कीच मान्य करतात की, त्या सौंदर्याच्या ओझ्याखाली ती सवडी पडून गेली आहे. की जाहिरातीतल्या मॉडेल-प्रमाणे दिसण्यासाठी ती जीवाचा आटापिटा करते. सध्या विशिष्ट दिसण्यासाठी कॉस्मेटिक सर्जरी करून घेणारे मोकळंपणाने बोलत नसले तरी पाश्चिमात्य जगामध्ये मात्र मॉडेल्स, अभिनेत्री याबद्दल बिनधास्तपणे बोलून टाकतात. कदाचित तोही त्यांच्या व्यवसायाची लोकप्रियता वाढवण्याचा भाग असेल. पण एका टप्प्यावर येऊन कादीजणी हे नक्कीच मान्य करतात की, त्या सौंदर्याच्या खोट्या व्याख्येने प्रभावित झाल्या होत्या.

ब्रिटनमधील सिलेब्रिटी मॉडेल आणि पेज ३ वर सातत्याने टॉप शहनाशी कैटी पेरीने २००४ मध्ये आत्मचरित्र लिहीलं. 'बीइंग जॉर्डन' असं त्या पुस्तकाचं नाव आहे. जॉर्डन हे तिचं अर्धांत टोपण नाव आहे. त्या पुस्तकात आपण स्तन मोठे करण्यासाठी तिने दोन वेळा केलेल्या सर्जरीचे वर्णन आहे. याचं कारण ती सांगते की आपल्या व्यवसायाची गरज. अमेरिकन टीव्हीवरील आणखी एक लोकप्रिय व्यक्तीमत्व म्हणजे जोन रिव्हर्स. तिनेसुद्धा सौंदर्याच्या व्याख्येत बसण्यासाठी अनेकदा प्लॅस्टिक सर्जरी केली आहे. आता वयाच्या ८० व्या वर्षी मात्र ती आपली चूक खूप दुःख व्यक्त करते. ती म्हणते की, "मी माझ्यावर एवढ्या प्लॅस्टिक सर्जरी केल्या

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

केल्या आहेत की, "मी माझ्यावर सहज्या प्लॉस्टिक सर्जरी केल्या आहेत की मी मेल्यावर माझा देह इप्पर ठेवल्या दान करण्यात येईल. यातील गोमतीचा भाग सोडून दया पण, या खोट्या सौंदर्याच्या मापात बसण्यासाठी स्त्रियांचा प्रचंड अट्टाहास चालतो की अनेकदा त्यांच्या सत्त्वेतीवर त्याचा परिणाम होऊ शकतो. प्रत्येक माणूस हा दुसऱ्यापेक्षा वेगळा असतो. त्याचं शिक्षण, दिसणं, बोलणं, वागणं, त्याच्याकडची कौशल्यं ही वेगळीच असतात. जैव विविधता ही नैसर्गिक आहे. पण भांडवलशाही कंपन्यांना आपली उत्पादनं खपवण्यासाठी ही जैवविविधता मान्य करायची नाहीये आणि एकाच प्रकारच्या रंग, उंची, जाडी महिलांच्या माथी मारायची आहे. कारण नफा हा एकच उद्देश डोळ्यासमोर ठेवून या कंपन्या भारतीय बाजारपेठेत उतरल्या आहेत. साउथ आफ्रिकेमध्ये ८० च्या दशकामध्ये मारियम मकेबा म्हणून एक अत्यंत हुशार गायिका होऊन गेली. तिला 'ममा आफ्रिका' म्हणूनही ओळखलं जात. 'काळे गाणे' या तिच्या मराठीतून प्रसिद्ध असलेल्या आत्मचरित्रामध्ये ~~सौंदर्यामध्ये~~ सौंदर्याबद्दल तिने खूप वेगळं निरीक्षण नोंदवलं आहे. तिने जेव्हा पहिल्यांदा अमेरिकेमध्ये आपल्या गाण्याचे कार्यक्रम ठेवले तेव्हा ती इतर गोऱ्या गायिका बघून चक्क झाली होती. त्यांचे कपडे, मेकअप, स्टाइल यांने मरियम खूप प्रभावित झाली आणि त्यांच्यासारखं दिसण्यासाठी

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

खदखदा हस करू लागली. खूप साश मेकअप करणं, लाल ओठ आणि गुलाबी गाल दिसण्यासाठी मेकअपचे वर - वर्‍या थर लावणं हे तिने खोटेपणाने करवन पाहिलं. पण शेवटी तिला लक्षात आलं की गोऱ्या लोकांची सौंदर्याची कल्पना वेगळी आहे. आणि काळ्या लोकांची वेगळी आहे. बहुतेक सौंदर्य प्रसाधनं ही गोऱ्या लोकांसाठी बनवलेली असतात. त्याचा कितीही वापर केला तरी मूळात काळी त्वचा असणारा माणूस गोरा होऊच शकत नाही. त्यानंतर तिने गोऱ्या गायिकांप्रमाणे सुंदर दिसण्याचा अट्टाहास सोडून दिला आणि केवळ आपल्या कलेवर प्रेम केलं. असाच कदीसा अनुभव आफ्रिकन वंशाच्या अमेरिकन लेखक अॅलेक्स हेलीने आपल्या 'रूट्स' या प्रचंड गाजलेल्या पुस्तकात दिला आहे. आफ्रिकेतल्या एका मुलाची अमेरिकेमध्ये गुलाम म्हणून विक्री होते अशा आशयाची ही कथा आहे. यामध्ये लेखक सांगतो की. गर्द काळा रंग हाच आफ्रिकन लोक खरं सौंदर्याचं लक्षण मानतात. त्या काळात त्या काळ्या रंगात जराही हलका रंग असेल तर तो सुंदर मानत नाहीत. हे दोन प्रसंग सांगण्याचा उद्देश हाच की जगभरामध्ये भौगोलिक परिस्थितीनुसार सौंदर्य बदलतं. पण अमेरिकन, पाश्चिमात्य सौंदर्याचे निकष परदेशी केपन्या आशिया सारख्या विकसनशील देशांच्या गळी उतरवतात आणि गोरा रंग हेच खरं सौंदर्य असं आपल्याला वाटायला लागतं.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

चित्रपटांचीही गत फारशी वेगळी नाही. स्मिता पाटीलच्या 'उंबरठा', तब्बूचा 'अस्तित्व', तेलुगू चित्रपट 'रुद्रम्मादेवी' अलीकडच्या काळात कंगना रानौतच्या 'क्वीन', प्रीटीच्या 'इंग्लिश-विंग्लिश', विद्या बालनच्या 'कहानी' असे मोजके प्रमुख भूमिकेत असलेले काही चित्रपट सोडले तर बहुसंख्य चित्रपटात हिरो दाखवण्याला महत्त्वाचा असतो. अभिनेत्री कायम दुय्यम भूमिकेत असते. त्यातही हिरोईनला अभिनय आला नाही तरी चालेल तिने सुंदर दिसणं जास्त गरजेचं असतं. त्यातूनच मग 36-24-36 किंवा झिरो फिगर या गोष्टी मॉडेल्स, अभिनेत्री यांच्यावर लादल्या जातात. अनेक अनेक अभिनेत्री अगदी वयाची पन्नाशी ओलांडली तरी हिरो म्हणून चित्रपटात काम करतात. त्यांना चाहतेही डोक्यावर घेतात. पण अभिनेत्री मात्र 25-30 वर्षांच्याच असाव्या लागतात. विशेषत: कमर्शिअल चित्रपटांमध्ये लग्न झाल्यानंतर हिरोईन म्हणून कमबॅक करणाऱ्या अभिनेत्रींची संख्या कमी आहे. त्याला कारणीभूत समाजाची मानसिकता आहे. हिंदी चित्रपटांनी महिलांचं चित्रीकरण करताना इतका विरोधाभास दाखवला आहे की त्याला तोड्य नाही. आई ही सर्वश्रेष्ठ आहे. ती कायम कुटुंबासाठी खस्ता खाणारीच असते. प्रसंग आल्यास ही साधी-सोज्वळ बाई कशी दुर्गा बनू शकते असंही दाखवलं जातं. निरुपमा रॉयने केलेल्या अनेक भूमिकांमधून ती अशा प्रकारची आई उभी करते.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

त्याचवेळी बलात्काराच्या सीनशिवाय किंवा आयटम सॉंगशिवाय चित्रपट चालत नाही. अशी मानसिकता बाळगूनही चित्रपट बनवले जातात. विद्या बालनच्या 'डर्टी पिक्चर' मध्ये सील्क या दाक्षिणात्य अभिनेत्रीची केलीली भूमिका स्त्रियांबद्दल चित्रपटसृष्टीचा असलेला दृष्टीकोन उलगडून दाखवते. एक ग्लॅमरस अभिनेत्री म्हणून काम करताना सिल्कला केवळ उत्तान अंगप्रदर्शनाच्या जोरावर फिल्म इंडस्ट्री डोक्यावर घेते. जेव्हा तिची गरज संपते तेव्हा तिची जागा घ्यायला दुसरी आगखी तरुण नायिका इंडस्ट्रीमध्ये आलेली असते. एकूनच अनेक अभिनेत्रींना अंग प्रदर्शन करायला भाग पाडलं जात आणि त्याची कॉन्ट्रोवर्सी झाली की चित्रपट बॉक्स ऑफिसवर हिट होतो असं समजलं जात.

आता थोडासा सोशल मिडीयाचा विचार करूया. स्मार्टफोनच्या वापरामुळे सोशल मिडीयाचा वापर प्रचंड वाढला आहे. माहितीची देवाणघेवाण ही केवळ काही सेकंदावर आली आहे. पण त्याचवेळी सोशल मिडीयाच्या वाढत्या वापरानंतर स्त्रियांचं चित्रण हे अनेकदा खालच्या पातळीवर गेलेलं दिसतं. बायका किती मूर्ख आहेत. याचे जोक्स तर सर्रास एकमेकांना फॉरवर्ड केले जातात. विशेषत: राजकारणातल्या महिला, सामाजिक क्षेत्रामध्ये असणाऱ्या महिला यांच्यावर खूपच खालच्या पातळीवर उतरून टीका केली जाते, त्यांचे फोटो मॉर्फ करून फिरवले जातात.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

पॉर्नोग्राफिक चित्रफिती तर खूप सहज उपलब्ध झाल्याने स्त्रियांचं विकृत चित्रण करण्याचे प्रकार अधिक वाढले आहेत. या सगळ्याच्या मागे केवळ पुरुषप्रधान संस्कृती नाही तर आणखीही काही राजकारण आहे. अमेरिकन लेखिका, पत्रकार नाओमी वुल्फच्या 'द ब्युटी मिथ' या पुस्तकाने ववा साली जगभर खळबळ माजवून दिली होती. स्त्रियांवर सौंदर्याचे नियम का लादले जातात याची चर्चा तिने पुस्तकात केली आहे. तिच्या मते, 1840 च्या सुमारास झालेल्या भांडवलशाहीच्या उदयानंतर स्त्रियांकडे एक वस्तू म्हणून बघितलं जाऊ लागलं. त्याच सुमारास स्त्रियांचे नग्न फोटो जाहिरातींमधून छापून यायला सुरुवात झाली. तिच्या मते, जगामध्ये असलेली 33 बिलियन डॉलर एवढी डाएट इंडस्ट्री, 20 बिलियन डॉलर एवढी कॉस्मेटिक इंडस्ट्री, 300 बिलियन डॉलर एवढी कॉस्मेटिक सर्जरी आणि 7 बिलियन डॉलर एवढी पॉर्न इंडस्ट्री स्त्रियांच्या ओंगळवाण्या चित्रणाला कारणीभूत आहे.

पारंपारिक माध्यम म्हणून वर्तमानपत्राचा आणि आधुनिक अशा न्यूज चॅनलचा विचार केला तरी लिंगेही बातम्यांमध्ये महिलांना युथम स्थान्य असत. महिला- महिलांमध्येही त्यांच्या सामाजिक आर्थिक स्तरावरुन भेदभाव केला जातो.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

बलात्काराची एखादी घटना शहरी भागात घडली त्याच्या बातम्या मोठ्या होतात. पण ग्रामीण भागामध्ये अशी घटना घडली तर मात्र तिला बातम्यांमध्ये स्थान मिळेल याची खात्री नसते. खरतर बलात्कार हा बलात्कार असतो. पण परिस्थितीनुसार त्याचं स्वरूप बदलतं. तसंच बलात्कारासारख्या घटनेमध्येही काही माध्यमं आंबट मनोरंजन करण्यावर भर देतात. काही वर्षांपूर्वी एका मुंबईतल्या टॅब्लॉइड वर्तमानपत्राने बलात्काराची बातमी देताना तो कसा झाला याचं सविस्तर वर्णन दिलं होतं बलात्कारासारखी घटना संवेदनशीलपने हाताळण्याचे नियम असतानाही त्या वर्तमानपत्राने बलातत्कारीत महिलेने पोलिसांना दिलेले स्टेटमेंट्स छापलं होतो. त्यावेळी त्या सर्व प्रकाराबद्दल टिकेची झोड उठली. पण, परिस्थिती फारशी बदलली नाही. एखादी महिला उच्च पदावर गेली, पायलट झाली. एखाद्या कंपनीमध्ये CEO झाली तर त्याची बातमी होते. माध्यमांच्या मते ही स्त्रियांची अचिव्हमेंट आहे. पण ग्रामीण भागातील एखादी अर्धशिक्षित महिलेसाठी पुरुषी राजकारणामध्ये सरपंच बसणं ही सोपी गोष्ट नसते. याकडे दुर्लक्ष केलं जातं. पेज थ्री प्रकारातल्या बातम्यांमध्ये तर सेलिब्रिटी महिलांच्या खाजगी आयुष्याला अक्षरशः नको तेवढी प्रसिद्धी दिली जाते. मनोरंजनाच्या नावाखाली प्रसिद्ध महिलांच्या खाजगी गोष्टींचं गॉसिप चघळलं जातं. ब्रिटनची सर्वाधिक लोकप्रिय असलेली प्रिन्सेस डायना

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

माध्यमांच्या याच गोंधळाच्या भूमिकेत भूकेच्या बळी ठरली होती. तिच्या खाजगी जीवनाचे फोटो मिळवण्याच्या नादात एका फोटोग्राफरने तिच्या खाजगी जीवनाचे फोटो मिळवण्याच्या नादात एका फोटोग्राफरने तिच्या गाडीचा पाठलाग केला होता आणि त्यातच तिचा अपघात होऊन ती गेली.

पुरुषप्रधान समाजामध्ये असलेलं स्त्रीचं दुय्यम स्थान हे नवीन नाही. त्याचंच प्रतिबिंब माध्यमांमध्ये स्पष्ट दिसतं. ते बदलण्याचे बदलण्याचे प्रयत्न होतात, लढे होतात. मात्र आजच्या भांडवलशाही जगामध्ये पैशांच्या जोरावर हे स्त्रियांसाठीचे लढे दाबून टाकले जातात. नफा कमावण्याचा लोभ इतका प्रचंड मोठा आहे की स्त्रीकडेसुद्धा एक निर्जीव वस्तू म्हणून पाहिलं जातं. स्त्रियांचा माध्यमांमध्ये वावर वाढायला लागल्यावरही स्त्रीची प्रतिमा पाहिजे तेवढी बदललेली नाही. काही वेळा पुरुषी हस्तक्षेपामुळे किंवा काही वेळा पुरुषी मानसिकता स्वीकारल्यामुळे उच्चपदस्थ महिलाही परिस्थिती फारशी बदलू शकत नाहीत. यासाठी स्त्रियांना मूळात एक माणूस म्हणून स्वीकारायला हवं. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा. स्त्रियांचा लढा केवळ स्त्रियांनीच नाही तर पुरुषांनीही लढायला हवा. अर्थात ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही. वर्षानुवर्षांची बंधनं झुगारून द्यायला ताकद लागते. पण बदल होतात आणि त्यामुळेच माणूस प्रगती करू शकतो.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

प्रसारमाध्यमांची स्त्रियांविषयी सकारात्मक भूमिका :-

स्त्रियांच्या समस्यांना प्राधान्य देणे:-

भारतातील स्त्रियांना येणाऱ्या समस्या दूरदर्शन आणि वर्तमानपत्रे विविध कार्यक्रमांद्वारे प्रसारित करीत आहेत. स्त्रियांवर होणारे अत्याचार यांना विविध कार्यक्रमांद्वारे प्रसारित केले जाते. यामुळे स्त्रियांच्या समस्यांविषयी पोलिस सरकार व न्यायदान संस्था लक्ष केंद्रित करतात. उदा. सरवादया बलात्काराच्या घटनेत संबंधित पुरुषाला गुन्ह्याच्या प्रमाणापेक्षा कमी शिक्षा दिली आणि प्रसार - माध्यमांनी हा विषय जनतेसमोर आणला तर निश्चितच त्यास योग्य न्याय मिळेल. स्त्रियांवर अत्याचार करणाऱ्या अनेक गुन्हेगारांना पोलिस दुर्लक्षित करतात गुन्हेगार श्रीमंत असेल किंवा राजकिय पार्श्वभूमी असलेला असेल तर पोलिस अशा गुन्हेगारास शिक्षा करण्यास बजावत नाहीत परंतु प्रसार माध्यमांनी हा विषय प्रखरतेने समाजासमोर आणल्यास त्यांना योग्य कृती करावीच लागेल. थोडक्यात समाजासमोर सत्य आणण्याचे कार्य अनेक प्रसार माध्यमे प्रामाणिकपणे करत आहेत.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

- प्रसारमाध्यमांनी स्त्रियांना पाठींबा देणे :
भारतीय स्त्रियांना येणाऱ्या अनेक समस्या, त्यांच्यावर होणारे अत्याचार, त्यांचा होणारा छळ इत्यादिसाठी प्रसारमाध्यमांनी स्त्रियांमध्ये जागृती करण्यासाठी स्त्रियांचे अधिकार व हक्क सर्व स्त्रियांपर्यंत पोहचविण्याचे कार्य करत आहेत. स्त्रिचे समाजातील स्थान, आईचे महत्व इत्यादीवर लक्ष केन्द्रित करुन, १५ मे हा 'आई दिवस' म्हणून पाळण्यात येतो.

- स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्यासाठी प्रयत्न :-

प्र प्रसारमाध्यमे स्त्रीयांचे समाजातील स्थान उच्च करण्याचे काम करु शकतात. आणि करितही आहेत. इंदिरा गांधी [राजकारण] मदर टेरेसा [सामाजिक कार्य] किरण बेदी [पोलिस खाते] किरण मझूमदार [उद्योगपती] पी. टी. उषा [क्रिडा] इ. स्त्रियांना प्रसार माध्यमांनी समाजासमोर त्यांच्या कर्तृत्वासह आणले पाहीजे. करिअरच्या त्यांच्या अपेक्षा रुंदावतील त्याचप्रमाणे त्या कोणत्याही प्रकारचे चॅलेंज करण्यास प्रवृत्त होतील. या चॅलेंजची स्त्रियांच्या कर्तृत्वाची जाणिव झाल्याने लक्ष्मण मुलींची पालकही त्यांना करिअरसाठी मदत करतील त्यांना विविध क्षेत्रात प्रवेश करण्यासाठी प्रवृत्त करतील.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

प्रसारमाध्यमांची स्त्रीयांविषयी नकारात्मक भूमिका :-

- स्त्रियांचे विकृत चित्रण :

स्त्री ही उपभोग्य वस्तू आहे असा सार्वत्रिक समज निर्माण करण्यास प्रसार माध्यमे आणि त्यातून केले जाणारे स्त्रियांचे विकृत चित्रण जबाबदार आहेत जाहिरातीमध्ये स्त्रियांचे भडक व उत्तेजक प्रदर्शन करण्यात येते. चलचित्रांमध्ये अर्धनग्नता आणि कामुक दृश्यांची रेलचेल असते. अशा विकृत चित्रणांमुळे काम-भावना चाळवते. आणि त्यातून स्त्रियांचा विनयभंग आणि बलात्कारांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत असल्याचे दिसून येते. या सर्वांमध्ये प्रसार माध्यमांनाच सर्व दोष देऊन चालणार नाही तर अनेक स्त्रिया मॉडेल प्रसिद्धिसाठी या सर्वांसाठी तयार होतात.

- स्त्रियांवर अत्याचार होणाऱ्या कार्यक्रमांचे प्रसारण :

अनेक दूरदर्शन मालिकांमध्ये आणि विविध कार्यक्रमांमध्ये स्त्रियांवरील अत्याचार दाखवले जातात. बलात्काराच्या घटना वारंवार दाखवल्या जातात. त्यामुळे पुरुषांना आयतीच चघळला विषय मिळतो.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

कार्यक्रमांमध्ये दाखविल्याप्रमाणे वाईट कृत्ये करण्याचे तरूणांच्या मनामध्ये येते. काही चित्रपटांमध्ये तर अगदी अश्लील चित्रण दाखवले जाते. दुरदर्शनवरील अनेक जाहिराती कुटुंबातील सदस्यांनी एकत्र बसून पाहण्यास ना लाज वाटते. अशाच अश्लील दूरदर्शनवरील विविध कार्यक्रमांमध्ये विवाह बाह्य संबंधांचे उदात्तिकरण आणि वास्तव चित्रण प्रसारित करण्यात येते.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

- निष्कर्ष -

स्त्रियांचा माध्यमांमध्ये वावर वाढायला लागल्यावरही स्त्रीची प्रतिमा पाहिजे तेवढी बदललेली नाही. काही वेळा पुरुषी हस्तक्षेपामुळे किंवा काही वेळा पुरुषी मानसिकता स्वीकारल्यामुळे अत्युच्चपदस्थ महिलाही परिस्थिती फारशी बदलू शकत नाहीत. यासाठी मूलात स्त्रियांना एक माणूस म्हणून स्विकारायला हवं. त्यांच्याकडे बघण्याचा दृष्टीकोन बदलायला हवा. स्त्रियांचा लढा केवळ स्त्रियांनीच नाही तर पुरुषांनाही लढायला हवा. अर्थात ही गोष्ट वाटते तेवढी सोपी नाही. वर्षानुवर्षांची बंधन झुगारुन द्यायला ताकद लागते. पण बदल होतात आणि त्यामुळेच माणूस प्रगती करु शकतो.

FOR EDUCATIONAL USE

Scanned with OKEN Scanner

University of Mumbai

Kharepatan Panchakroshi Shikshan Prasarak Mandal, Kharepatan's

ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE, KHAREPATAN

(Affiliated to University of Mumbai - No. ICM / I / 558 / 2012 – 13)

Programme : SCIENCE
Department: SCIENCE
Class: F.Y.B.Sc.
Course / Subject : FOUNDATION COURSE

Academic Year : 2023-24
Term:
Semester: I
Paper -I

Sr. No.	Roll No.	Name of The Student	Name of Project Given
1	7301	CHAVAN RIYA VILAS	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
2	7302	HARYAN YASH GANPAT	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
3	7303	JADHAV GAURAV JALINDAR	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
4	7304	JADHAV RAJ RUPESH	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
5	7305	KAZI SAUD HUSSAINMIYA	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
6	7306	KHANDEKAR ARADHYA AJAY	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
7	7307	KHANDEKAR AVINASH LAXMAN	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
8	7308	MUJAWAR ASIYA KHALIL	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
9	7309	NANDKAR UMMITANURA MAJID	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
10	7310	PAJAVE VAISHNAVI VIJAY	भारतातील बेरोजगारी एक आर्थिक समस्या
11	7311	PATANKAR SUJAY SURAJ	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास
12	7312	PAWAR PAYAL KRISHNA	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास
13	7313	SARANG HALEEMA IRFAN	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास
14	7314	SOLKAR AASIFA AASIF	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास
15	7315	TAMBE RUSHIKESH SANTOSH	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास
16	7316	UPADHYE RUTUJA MAHAVEER	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास

Project Teacher

Principal

PRINCIPAL
Arts Commerce & Science College Kharepatan
At.Po.Kharepatan Tal.Kankavli Dist.Sindhudurg

Scanned with OKEN Scanner

University of Mumbai

Kharepatan Panchakroshi Shikshan Prasarak Mandal, Kharepatan's

ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE, KHAREPATAN

(Affiliated to University of Mumbai - No. ICM / 1 / 558 / 2012 – 13)

Programme : SCIENCE **Academic Year :** 2023-24

Department: SCIENCE **Term:**

Class: F.Y.B.Sc. **Semester:** II

Course / Subject : FOUNDATION COURSE **Paper -II**

Sr. No.	Roll No.	Name of The Student	Name of Project Given
1	7301	CHAVAN RIYA VILAS	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
2	7302	HARYAN YASH GANPAT	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
3	7303	JADHAV GAURAV JALINDAR	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
4	7304	JADHAV RAJ RUPESH	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
5	7305	KAZI SAUD HUSSAINMIYA	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
6	7306	KHANDEKAR ARADHYA AJAY	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
7	7307	KHANDEKAR AVINASH LAXMAN	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
8	7308	MUJAWAR ASIYA KHALIL	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
9	7309	NANDKAR UMMITANURA MAJID	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
10	7310	PAJAVE VAISHNAVI VIJAY	जागतिकीकरण आणि त्याचा भारतीय संस्कृतीवर प्रभाव
11	7311	PATANKAR SUJAY SURAJ	शहरीकरण आणि स्थलांतर
12	7312	PAWAR PAYAL KRISHNA	शहरीकरण आणि स्थलांतर
13	7313	SARANG HALEEMA IRFAN	शहरीकरण आणि स्थलांतर
14	7314	SOLKAR AASIFA AASIF	शहरीकरण आणि स्थलांतर
15	7315	TAMBE RUSHIKESH SANTOSH	शहरीकरण आणि स्थलांतर
16	7316	UPADHYE RUTUJA MAHAVEER	शहरीकरण आणि स्थलांतर

Project Teacher

Principal

PRINCIPAL
Arts Commerce & Science College Kharepatan
At.P.Kharepatan.Tal.Kankavli.Dist.Sindhudurg

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/_

PROJECT REPORT ON

भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास

A Project Submitted to University Of Mumbai for partial Completion Of the degree of

Bachelor of Science
Under the faculty of ~~Commerce~~ Science

By

AASIFA AASIF SOLKAR

Roll number :- 7316

SEMESTER - I

under the Guidance of
Namira Mujawar

ARTS, COMMERCE AND SCIENCE
COLLEGE KHAREPATAN

ACADEMIC YEAR :- 2023-24.

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/____

KHAREPATAN PANCHKROSHI SHIKSHAN PRASARAK MANDAL'S

Arts Commerce & Science College Kharepatan

CERTIFICATE

This is to certify that Ms./Mrs. Aasifa Aasif Solkar has worked and duly completed her project work of the degree of Bachelor in Science under the faculty of Science in the subject of foundation course and her project is entitled.

भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान याचा सविस्तर अभ्यास

Under my supervision.

I further certify that the entire work has been done by the learner under my guidance and that no part of it's has been submitted previously for any Degree or Diploma of my University.

It is her own work and facts reported by: her personal findings and investigations.

Date of Submission

Name and Signature of Guiding Teacher

Heads Signature

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/____

DECLARATION BY LEARNER

I the undersigned MISS. Nasifa Nasif Solkar here by, declare that the work embodied in this project worked titled भारतीय समाजातील स्त्रीयांचे महत्व व स्थान यांचा सविस्तर अभ्यास. forms my own contribution to the research work carried out under the guidance of Namira M. Mujawar madam is a result of my own research work and has not been previously submitted to any other University for any other Degree/ Diploma to this or any other University.

Wherever reference has been made to previous works of others, it has been clearly indicated as such and included in the bibliography.

I here by further declare that all information of this document has been obtained and presented in accordance with academic rules and ethical conduct.

Certified by

Name and Signature of the learner

Name and Signature of the guiding Teacher

Scanned with OKEN Scanner

truelines

DATE : _/_/____

ACKNOWLEDGEMENT

I take this opportunity to thank the University of Mumbai for giving me chance to do this project.

I would like to thank my Principal डॉ. आत्माराम कांबळे for providing the necessary facilities required for completion of this project.

I place my Sincere thanks to my Guiding Teacher नम्रता मुजावर for her guidance and advices to complete my work Successfully.

Lastly, I would like to thank each and every person who directly or indirectly helped me in the completion of the project especially my Parents and peers who supported me throughout my project.

PRINCIPAL

Arts, Commerce & Science College Khanapur,
Dist. Sangli

Principle Sign

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/____

अनुक्रमणिका

अ.क्र	घटकांचे नाव	पृष्ठ क्रमांक	सही
1)	प्रस्तावना	1-2	
2)	उद्दिष्टे	3-4	
3)	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान यांचे स्वरूप	5-9	
4)	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान यांची निर्मिती प्रक्रिया	10-12	
5)	भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान यांचे वैशिष्ट्ये	13-16	
6)	स्त्रियांचे स्थान व अधिकार	17-18	
7)	निष्कर्ष	19	
8)	संदर्भ	20	

Scanned with OKEN Scanner

प्रस्तावना

मी लहानपणापासून ऐकत आले एकविसाव्या शतकामध्ये स्त्री पुरुष समानता होणार, स्त्री सक्षम होणार. २०२१ साल उजाडले पण स्त्रीयांना विषयी पुरुषांचे मानसिक विचार काही बदलले नाहीत. १८४८ साली पुण्यात, मुलींची पहिली शाळा महात्मा ज्योतिबा फुले आणि सावित्रीबाई फुले यांनी चालू करून स्त्रियांना जी दूरदृष्टी दाखवली त्याला खरंच आज तोड नाही. जाचक धार्मिक बंधने आणि पुरुषसत्ताक व्यवस्थेच्या ~~ज्या~~ जात्यात रोज भरडल्या जाणाऱ्या लाखो स्त्रियांसाठी 'शिक्षण' एक अपूर्व असा आत्मभानाचा प्रकाश घेऊन आले. शिक्षण घेण्यासाठीचा स्त्रियांचा लढा हा कधीच सोपा नव्हता आणि आजही नाही. निसर्गाने दिलेल्या जबाबदाऱ्या तर तिला पार पाडाव्याच लागतात. त्याच बरोबर तिच्यावर लादल्या गेलेल्या ही जबाबदाऱ्या ती पार पाडतच आहे.

महिलांना शिक्षणामुळे आत्मविश्वास आला. त्या सक्षम झाल्या आहेत, पण त्यांचे सक्षमीकरण पचवू शकणारे पुरुष आपला समाज तयार करू शकलेला नाही. राजकीय पोंगंडावरच्या -मध्ये स्त्रिया वाहून जाताना दिसत आहेत. तर दुसरीकडे स्त्रियांची सामाजिक सुरक्षितता प्रचंड धोक्यात आलेली आहे. लहान मुलींवर लैंगिक अत्याचार वाढले आहेत. पुरुषसत्ताक मानसिकतेमुळे प्रेमात नात्यात नकार न पचवू शकणारे पुरुष

Scanned with OKEN Scanner

तसेच एकतर्फी प्रेम करणारे पुरुष ॲसिड स्वतः बलात्कार, चारित्र्यहीन करणारे पुरुष दिवसेंदिवस वाढतच आहेत. पुरुषसत्ताक अवशेषामध्ये आजही तिला तिच्या वैयक्तिकतेविषयी अबोल राहावे लागत आहे.

आपल्या समाजामध्ये पुरुषांचा स्त्रियांकडे बघण्याचा दृष्टिकोन खूप वेगळा आहे. मुलगा-मुलगी अजूनही भेदभाव केला जातो. पुरुष हा स्त्रीला त्याच्या हातातले खेळणं, कटपुतली, त्याच्या इशाऱ्यावर नाचणारी एक बाहुली समजतो. आणि अजूनही आपल्या समाजामध्ये स्त्रियांना दुय्यम दर्जाचे स्थान दिले जाते.

Scanned with OKEN Scanner

उद्दिष्टे

1) एखादया मुलीला मुलगा आवडत असल्यास, पण तो लग्नाला तयार नसल्यास मुलगी पाण्याचा हंडा घेऊन सरळ त्याच्या घरात घुसते. लग्नाचा हट्ट करते. दुर्गम भागात अजूनही हे घडते. इतका मोकळेपणा इथल्या स्त्रियांच्या वाटयाला येतो.

2) आदिवासी संस्कृती पुरुषप्रधान असली तरी, या समाजात स्त्रियांचे स्थान उच्च व मानाचे आहे. समाजात वावरताना आर्थिक व सामाजिक जीवन सुकर करण्यासाठी स्त्रिया कितपत मदत करतात यावर हे अवलंबून असते. आदिवासी संस्कृतीने, परंपरेने महिलांना समान हक्क दिले आहेत. सगळीकडे स्त्रियांचा वावर मुक्त असतो. श्रमशक्तीमुळे ती दैनंदिन घरकाम व अर्थोत्पादनाच्या कार्यात कुटुंबाचा आधार असते. श्रमशक्ती व जननक्षमता या गुणवैशिष्ट्या -मुळे कुटुंबातील उपयुक्त व्यक्ती बनते.

3) स्त्रीभ्रूण हत्येची समस्या येथे दिसत नाही. मागास समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याची स्त्री-पुरुष प्रमाण हाजारमागे १८६ इतके आहे. पुरुष नसबंदीचे प्रमाण येथे ५० टक्के आहे. येथे बालविवाह होत नाहीत. मुली वयात आल्यावरच तिच्या मर्जीनुसार विवाह होतो.

Scanned with OKEN Scanner

कुठलेही दडपण आणले जात नाही. जोडीदाराची निवड करताना गोत्रासंबंधीच्या (देवानुसार. उदा. सात देव विरुध्द सहा देव) परंपरेचे कटाक्षाने पालन केले जाते. विवाहानंतर तो संबंध अयशस्वी झाला तर काडीमोड करण्याचा अधिकारही स्त्रियांना आहे. वैधव्य आलेतर पुनर्विवाह करता येतो. मृत पतीच्या मालमत्तेवर तिचा अधिकार असतो.

4) लग्नात वधुमूल्य ही प्रथा अजूनही आहे. वरपित्याने रिवाजानुसार नाममात्र मूल्य देऊन (कोंबडा, धान्य, दारू, काही रक्कम) वधू घरी आणावी असा हा नियम. वरपक्षाला वधू मिळविण्यासाठी किंमत देणे अशक्य असल्यास तो वधुपित्याकडे काही वर्षे शेतात काम करून त्या मोबदल्यात वधूची मागणी करतो. वधू ही मूल्य देऊन आणली तरी तिला कमी न लेखता तिच्यातील गुणांचा-पात्रतेचा आदर करण्याची भावना त्यामागे आहे.

5) स्त्रियांची दिनचर्या साधी व सरळ असते. मुलगा पहाटे अंगणातील झाडलोट, सडासारवण करणे. आंबिल, भात, भाजी करून पतीसोबत ती दंडावर (शेती) जाते. दिवसभर बरोबरीने शेतातील कामे करते.

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/__ 5

भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान यांचे स्वरूप

केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षा: पेपर-१ च्या अभ्यासक्रमातील 'स्त्रियांची भूमिका आणि स्त्री संघटना' या उपघटकाविषयी...

भारतीय समाजामध्ये स्त्रियांच्या सामाजिक दर्जासंदर्भात कमालीचा विरोधाभास आढळतो. एका बाजूला स्त्रियांचे धर्माधिष्ठित गौरवीकरण (काल्पनिक) व दुसऱ्या बाजूला समाजात प्रत्यक्षात होणारे दुय्यम स्थान, शोषण असा हा विरोधाभास आहे. एका बाजूला 'स्त्री-प्रतिष्ठा' हा समाजाच्या श्रेष्ठत्वाचा निकष (पुस्तकी) व दुसऱ्या बाजूला सामाजिक स्तरीकरणामध्ये शेवटचे स्थान असा हा विरोधाभास असा केंद्रीय लोकसेवा आयोगाच्या मुख्य परीक्षा पेपर-१ च्या अभ्यासक्रमातील 'स्त्रियांची भूमिका व स्त्री संघटना' यावर चर्चा करूया.

भारतीय समाज मुख्यतः पुरुषप्रधान संहिता आहे. अर्थात, केरळमधील नायर, मेघालयमधील खेदटी, बंगाली समाज व काही भटक्या जमातींमध्ये स्त्रीप्रधानतेचे प्रमाण दिसते. परंतु, सर्वसामान्यपणे विचार करता, भारतीय समाजातील स्त्रियांना दुय्यम स्थान असल्याचे प्रकर्षाने जाणवते. तद्धतच, अनेक रूढी, परंपरा (अनेक धर्मातील) यांमुळे स्त्रियांवर अन्याय, शोषण, सामाजिक विषमतीकरण झाल्याचे दिसते. स्त्रियांना सार्वजनिक जीवनातील सहभाग नाकारण्यात आला. या पार्श्वभूमीवर भारतात

Scanned with OKEN Scanner

स्त्रियांचे भूमिका, त्यांचे शोषण, न्याय्य अधिकार यावर आधारित चळवळी व संघटना उभ्या राहिल्या. भारतातील स्त्री-चळवळीचे तीन टप्पे करता येतील. पहिला टप्पा (१८३०-१९१५); दुसरा टप्पा (१९१५-१९४७) तिसरा टप्पा (१९४७ पासून पुढे).

पहिल्या टप्प्यामध्ये मुख्यतः काही पुरोगामी पुरुषांच्या पुढाकारामुळे महत्त्वाचे बदल घडताना दिसतात. यामध्ये सती-बंदी (१८२९), विधवा पुनर्विवाह कायदेशीर मान्यता (१८५६), स्त्रीभ्रूणहत्या प्रतिबंध (१८७०), आंतरजातीय विवाहास मान्यता (१८७२) संमतिवयामध्ये वाढ (१८९१) यांचा समावेश होतो. यासंदर्भात ईश्वरचंद्र विद्यासागर, वीरेशलिंगम पंतुलू, पंडिता रमाबाई, राजा राममोहन रॉय, धोंडो केशव कर्वे, मुथ्थुलक्ष्मी, जोतिबा-सावित्रीबाई फुले यांचे कार्य महत्त्वाचे ठरते.

दुसऱ्या टप्प्यामध्ये भारत महिला परिषद, भारत स्त्री महामंडळ, विमेन्स इंडियन असोसिएशन (WIA), नॅशनल कौन्सिल ऑफ विमेन फॉर इंडिया, ऑल इंडिया विमेन्स चळवळीद्वारे प्रांतामध्ये स्त्रियांना मतदानाचा अधिकार (१९२१), बालविवाह प्रतिबंधक कायदा (१९२९), स्त्रियांना मर्यादित प्रमाणात मालमत्तेचा हक्क (१९३७) यांसारखे महत्त्वपूर्ण बदल झाले.

स्वातंत्र्योत्तर काळातील स्त्री-चळवळीचे पुन्हा तीन टप्पे करता येतील. १९४७ पासून ते १९७० च्या दशकापर्यंत राष्ट्र बांधणीच्या कार्याला प्राधान्य दिले गेले. अर्थात संविधानात अंतर्भूत मूलभूत हक्क व राज्याची मार्गदर्शक तत्त्वे यांमध्ये स्त्रियांचे हक्क व अधिकार यांना योग्य न्याय देण्याचा प्रयत्न

Scanned with OKEN Scanner

केला गेला. पण, या तरतुदींच्या अंमलबजावणीतील अपयशामुळे १९७० च्या दशकात स्त्री-चळवळीचा स्वातंत्र्योत्तर कालखंडातील दुसरा टप्पा सुरू झाला. या टप्प्यामध्ये असमान वेतन, स्त्रियांचे 'अकुशल' कामगारांत वर्गीकरण, विनामोबदला श्रम, सामाजिक संस्थांमधील (जात, धर्म, वर्ग, कुटुंब इत्यादी) सत्तेच्या संरचनेतील पुरुषी वर्चस्व या समस्यांवर भर होता. स्वातंत्र्योत्तर कालखंडातील २१ व्या शतकातील टप्प्यामध्ये स्त्री-चळवळ स्त्री-पुरुष समानतेच्या पलीकडे जाऊन स्त्रियांची वैयक्तिक जीवन ठरवण्याची सत्ता व त्यांचे सक्षमीकरण यांसारख्या मुद्दयांवर प्रकाश टाकते. भारतामधील स्त्री-चळवळीचा एक प्रवाह वरील आढाव्यावरून स्पष्ट होतो. आजही अनेक गंभीर स्त्री-समस्या भारतीय समाजासमोर उभ्या आहेत. रूढी-परंपरांचा पगडा, प्रत्येक धर्मातील खासगी जीवन नियंत्रित करणारे धार्मिक कायदे (धर्मशास्त्र, शरीया, इ.) विपरीत स्त्री-पुरुष प्रमाण (९३३: १०००), समान नागरी कायद्याचा अभाव, कौटुंबिक हिंसा, हुंडाबळी, बलात्कारांच्या घटना, नोकरी करणाऱ्या स्त्रियांचे प्रश्न यांसारख्या समस्यांना स्त्री-समाजाला आजही तोंड द्यावे लागते. या समस्यांचे आकलन व त्यावरील उपाय यांचा अभ्यास करणे आवश्यक आहे. २०१८ च्या मुख्य परीक्षेतल्या प्रश्नांवर नजर टाकल्यास हे स्पष्ट होते. उदा. 'How does patriarchy impact the position of a middle class working in India?'

भारतीय समाजामधील स्त्री-समस्यांना इतरही आयाम आहेत. वेगवेगळ्या वर्गातील, जाती-जमातीमधील, प्रदेशामधील स्त्री-समस्यांचे स्वरूप वेगवेगळे

आहे. शहरी स्त्रियांच्या समस्या, ग्रामीण व शेतमजूर असणाऱ्या स्त्रियांच्या समस्या, भटक्या व आदिवासी समाजातील स्त्रियांच्या समस्या वेगवेगळ्या स्वरूपाच्या आहेत. २०१८ च्या मुख्य परीक्षेत विचारल्या गेलेल्या पुढील प्रश्नाचे उत्तर देताना शेती क्षेत्रातील स्त्रियांची स्थिती व समस्या यांचे आकलन उमेदवाराला असणे अपेक्षित होते.- 'Discuss the various economic and sociocultural forces that are driving increasing feminisation of agriculture in India.' याच परीक्षेतील प्रश्न- 'Why do some of the most prosperous region of India have an adverse sex ratio for women?' या प्रश्नाचे उत्तर देताना भारतातील काही आर्थिकदृष्ट्या समृद्ध प्रदेशातील विपरीत स्त्री-पुरुष गुणोत्तरामागील कारणांचा वेध घेणे अपेक्षित आहे. या घटकाच्या अभ्यासासाठी समाजशास्त्राचे मूलभूत ज्ञान (NCERT च्या पुस्तकांचे वाचन), समाजातील स्त्रियांच्या स्थितीचा अभ्यास (वर्तमानपत्राचे वाचन) व स्त्रियांच्या समस्येची कारणे व उपाय यावर भर देणे आवश्यक ठरते. तद्धतच, स्त्री-सक्षमीकरण, सार्वजनिक क्षेत्रातील स्त्री-सहभाग वाढवण्यासाठीच्या उपाययोजना, स्त्रियांच्या राजकीय प्रतिनिधित्वामध्ये वाढ होण्यासाठीचे उपाय, समाजाची मानसिकता बदलण्यासाठीचे उपाय यांसारख्या बाबींचा अभ्यास आवश्यक ठरतो. एकविसाव्या शतकातील नवीन घटकांचा स्त्रियांच्या सामाजिक स्थितीवर दूरगामी परिणाम होत आहे. माहिती-तंत्रज्ञान, जागतिकीकरण, नव्या शैक्षणिक संधी, नवे तंत्रज्ञान या घटकांचा या संदर्भातील अभ्यास आवश्यक आहे. NCERT च्या पुस्तकांचे वाचन, राम आहुजा यांचे भारतीय

समाजावरील संदर्भग्रंथ (किंवा यासारखे एखादे प्रमाणित पुस्तक) व अभ्यासक्रमानुरूप केलेले वर्तमानपत्रांचे निवडक वाचन या परीक्षेच्या समाजशास्त्र घटकांसाठी पुरेसे ठरावे.

truelines
DATE: __/__/__ 10

भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्त्व व स्थान यांची निर्मिती प्रक्रिया

ॲण्ड. भास्करराव आव्हाड

कुटुंबव्यवस्था हे भारताचे बलस्थान आहे. मात्र, ती सुरळीत व सुस्थितीत आहे, असे ठामपणे म्हणता येणार नाही. आजची कुटुंबव्यवस्था विघटनाच्या दिशेने जोराने पाऊल टाकू लागली आहे. भारतीय जवळ जवळ सर्वच क्षेत्रांत सामाजिक जीवनामध्ये कमालीचे औदासिन्य, अनैतिकता, भ्रष्टाचार पहायला मिळतो. आज आपल्याकडेही अनेक कुटुंबांत घटस्फोट, कलह वगैरे होत आहेत. हा व्यक्तिस्वातंत्र्याचा परिणाम असल्याची अथळ प्रतिक्रिया काही मंडळी देत असतात. काही लोक याबाबत स्त्रियांना दोषी धरतात. मात्र, असा दोषारोप करण्याच्या आधी याबाबत भारतीय संस्कृतीचे अवलोकन करायला हवे. आपल्या संस्कृतीमध्ये जे-जे काही चांगले, पवित्र, उदात्त आहे ते सर्व स्त्रियांच्या सहभागाने साध्य झालेले आहे. सांस्कृतिक मूल्यांची जोपासना स्त्रियांनी जास्त प्रमाणात केला आहे; परंतु हे घडत असताना स्त्रियांवर अन्याय झाला आहे. कुटुंब व्यवस्था टिकवण्यासाठी आणि सांस्कृतिक मूल्य-संवर्धनासाठी स्त्रियांनीच मोठ्या प्रमाणावर त्याग केला आहे. याबाबत पुरुषांचा वाटा नगण्य आहे. स्त्रियांवर जबाबदाऱ्या लादून समाजसंस्कृती संवर्धन करण्याच्या प्रक्रियेत त्यांच्यावर अन्याय झाला आहे. तो त्यांनी सहन केला तरच सांस्कृतिक

Scanned with OKEN Scanner

truelines 11
DATE : _/_/___

मूल्य टिकणार, हे म्हणणे योग्य नाही. स्त्रियांनी अन्याय सहन करण्याचे नाकारले किंवा त्यांनी न्यायाच्या वाटेने जायचे ठरवले तर जी काही सामाजिक व सांस्कृतिक मूल्ये कोलमडून पडतील ती स्त्री मूल्य नव्हती, हे आपण मान्य केले पाहिजे. कारण तो समाजाच्या एका घटकाने दुसऱ्या घटकाच्या शोषणातून व गुलामगिरीतून मिळवलेला गैरवाजवी सामाजिक फायदा ठरतो. जी स्त्री सुशिक्षित होईल आणि त्याहून महत्त्वाचे म्हणजे आर्थिक स्वायत्तता मिळवेल, ती अन्यायाचे जोखड फेकूनच देणार हे तर महात्मा फुलेंनी सांगितले आहे. जशा जशा स्त्रिया शिकताहेत व आर्थिक स्वायत्तता मिळवत आहेत तिथे तिथे पुरुषी वर्चस्वाचे जोखड फेकले जात आहे. आणि मग पुष्कळदा आपल्याकडेही कुटुंबव्यवस्था मोडून पडताना दिसते; पण याचा दोष आपण स्त्रियांना देणार आहोत का?

जी-जी व्यवस्था स्त्रियांच्या त्यागावर व शोषणावर अवलंबून असेल तिथे तिथे अन्याय करणारा घटक पुरुषच असतो, हे स्पष्ट आहे. स्त्रीची बरोबरीची क्षमता मान्य केल्यानंतर कौटुंबिक जबाबदाऱ्या बरोबरीने उचलण्यासाठी पुरुष कचरत असतील तर ते स्त्रियांचे शोषण करण्याची सवय सोडू शकत नाहीत आणि समान कौटुंबिक जबाबदाऱ्या स्वीकारण्यात प्रतिष्ठेच्या कारणांवरून ते लाजत असतील, तर मग पुरुषी अहंकारात आणि बौद्धिक समजुतीतच मग दोष आहे, असेच समजावे लागेल! आपली कौटुंबिक संस्कृती टिकवायची असेल तर आणि या बाबतीत तरी आपल्याला जगात आदर्श निर्माण करायचे असेल, तर पुरुषांनी आत्मपरीक्षण

कराशला हवे आणि येऊ घातलेल्या विघटनांचे खरे कारण आपण आहोत हे मान्य कराशला हवे. त्यानुसार त्यांनी स्वतः मध्ये आवश्यक ते बदल करून मृत्ये जोपासायला हवीत. असे न केल्यास होणाऱ्या परिणामांचा दोष पुरुषांनी स्वतःकडे घेतला पाहिजे. त्यासाठी स्त्रियांना जबाबदार धरू नये.

अशा सर्व सामाजिक चळवळींचे नेतृत्व स्त्रियांकडे च असायला हवे; कारण शोषण कुठे, कसे व किती होते हे शोषितालाच कळू शकते, शोषकाला नव्हे! आणि म्हणून पुष्कळ सामाजिक चळवळीत व सामाजिक क्षेत्रात पुरुषाला न दिसणारे अन्याय स्त्रियांच्या नजरेत स्पष्टपणे भरतात. हा दृष्टिकोनाचाच फरक आहे. आणि म्हणून अशी चळवळ स्त्री नेतृत्वाखाली चालावी; परंतु या नेतृत्वाच्या मागे केवळ स्त्री अनुयायी असावेत असे अभिप्रेत नाही, अनुयायी पुरुष असले पाहिजेत किंबहुना सर्व समाजच असला पाहिजे. असे घडले तरच येऊ घातलेल्या कोलाहलात आणि वादळात आपली सांस्कृतिक मूल्ये तग धरतील.

भारतीय समाजातील स्त्रियांचे महत्व व स्थान यांचे वैशिष्ट्ये

1) भारतीय स्त्रियांचे सामाजिक स्थान :
* भारतीय वैदिक साहित्य आणि इतिहास संशोधनाच्या आधारे असे दिसते की पूर्व वैदिक काळातील स्त्रियांचे सामाजिक स्थान तुलनेने अधिक उच्च दर्जाचे होते. परंतु त्यांना पुरुषांच्या बरोबरीचा दर्जा होता असे मात्र म्हणता येणार नाही. त्या काळी पितृप्रधान समाजव्यवस्था होती आणि आजही ती तशीच आहे.

2) पूर्व वैदिक काळातील स्त्रियांना वेदांचे शिक्षण घेण्याची मुभा होती. त्यांना उपनयन संस्कारास्चा अधिकार होता. त्यामुळे त्यांना गुरुगृही राहून शिक्षण घेता येत असे. ऋग्वेदामध्ये वेदविदया प्राप्त केलेल्या स्त्रियांना अत्यंत मानाचे स्थान होते.

3) अशा स्त्रियांचे दोन प्रकार ऋग्वेदात सांगितलेले आहेत: 'सदयवध्रू' म्हणजे उपनयनाचा संस्कार पूर्ण होताच्य गुरुगृही न जाता विवाह होऊन सासरी पाठवल्या गेलेल्या मुली. 'ब्रह्मवादिनी' म्हणजे उपनयनाचा संसार प्राप्त झाल्यानंतर वेदांचे शिक्षण घेऊन वेदविदयेत पारंगत झालेल्या स्त्रिया. त्या आजन्म अविवाहीत राहून वेदांचे अध्ययन आणि अध्यापन करत असत.

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE: / / 14

काळाबरोबर जातीजातींमध्येल भेद अधिक कडक होत गेले.

9) जातिव्यवस्थेतील विषमता वाढत गेली. या घडामोडींमध्ये स्त्रियांचा दर्जा अधिकच खालावत गेला. स्त्रियांना शिक्षणाचा अधिकार नाकारला गेल्यामुळे त्यांचा उपनयनाचा आणि गुरुकुलात राहून शिकण्याचा अधिकारही संपुष्टात आला.

10) 'विवाह' हा एकमेव संस्कार आणि बालवयातील विवाह हेच स्त्रियांचे वास्तव ठरले.

11) आतापर्यंत तुम्ही याची नोंद घेतलेली असेल की पूर्व वैदिक काळात सामाजिक आणि कायदेशीर हक्कांच्या दृष्टीने स्त्रियांचे स्थान उत्तर वैदिक काळाशी तुलना केली असता अधिक मानाचे होते परंतु तेव्हाही ते पुरुषांच्या बरोबरीचे नव्हतेच. स्थावर संपत्तीवर त्यांना अधिकार नव्हता.

12) उत्तर वैदिक काळात स्त्रियांचा सामाजिक दर्जा घसरत गेला. स्त्रिया फक्त घरगुती कर्तव्यांशी बांधल्या गेल्या आणि सामाजिक सभांमधून त्यांनी सहभागी होणे वर्ज्य करण्यात आले.

13) स्त्रियांचा कुटुंबातील दर्जा गौण ठरला. कुटुंबपद्धती पितृप्रधान असणे आणि संपत्तीचा आणि वंशावळीचा वारसा हा पित्याकडून पुत्राकडे जाणे ही पूर्वापार प्रथा आणखी खोलवर रुजली.

Scanned with OKEN Scanner

truelines 15
DATE : / /

4) स्त्रियांना वेद आणि वेदांच्या स्पष्टीकरणाशी निगडित असलेली वेदांगे या दोन्हींचे शिक्षण दिले जात असे. नंतर मात्र स्त्रियांचे शिक्षण फक्त धार्मिक स्तवने आणि कविता यांच्यापुरते मर्यादित झाले.

5) वेद आणि उपनिषदांचे ज्ञान प्राप्त केलेल्या स्त्रियांमध्ये अपाला, घोषा, लोपामुद्रा, गार्गी, मैत्रेयी अशा काही पंडिता विशेष नावाजलेल्या होत्या तत्कालीन समाजामध्ये स्त्रियांची भूमिका समाजोपयोगी आणि अर्थोत्पादक समजली जात होती. त्यांना 'विदश' या नावाने ओळखल्या जाणाऱ्या सामाजिक सभांमध्ये सहभागी होता येत असे. त्यांना आयुष्याचा जोडीदार स्वतः निवडण्याची मुभा होती.

6) 'विवाह' हा एक पवित्र संस्कार मानला जाई आणि तो मोडण्यास मान्यता नव्हती. मात्र स्त्रीने विवाह केलाच पाहिजे अशी सक्ती नव्हती. एकपत्नीत्वाला प्राधान्य होते.

7) उपनिषदांमध्ये 'अनुलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णाच्या कनिष्ठ दर्जाच्या वर्णातील वधूशी विवाह आणि 'प्रतिलोम विवाह' म्हणजे उच्च वर्णातील वधूचा कनिष्ठ वर्णातील वराशी विवाह, या प्रकारांचा उल्लेख आढळतो.

8) उत्तर वैदिक काळात जातिव्यवस्था आणि पुरोहितवर्गाचे वर्चस्व समाजामध्ये खोलवर रुजले

त्यामुळे स्त्रियांनी जन्मापासून विवाहापर्यंत पित्याच्या, विवाहापासून पतीच्या मृत्यूपर्यंत पतीच्या आणि पतीच्या मृत्युनंतर पुत्राच्या आज्ञेत रहावे, असा दंडक घातला गेला.

14) मुलीचा जन्म ही घटना अवांछित मानली जाऊ लागली. तसेच हुंडापद्धती सुरू झाल्याचे दिसते. 'गौतम धर्मसूत्र' या ग्रंथात मुलीचे कौमार्य आणि पावित्र्य भंग होऊ नये म्हणून तिचा विवाह तिला ऋतुप्राप्ती होण्याअगोदर करावा, असे म्हटलेले आहे.

Term: ...

truelines
DATE: __/__/__ 17

स्त्रियांचे स्थान व अधिकार

आदिवासी संस्कृती पुरुषप्रधान असली तरी, या समाजात स्त्रियांचे स्थान मुख्य व मानाचे आहे. समाजात वावरताना आर्थिक व सामाजिक जीवन सुकर करण्यासाठी स्त्रिया कितपत मदत करतात यावर हे अवलंबून असते. आदिवासी संस्कृतीने, परंपरेने महिलांना समान हक्क दिले आहेत. सगळीकडे स्त्रियांचा वावर मुक्त असतो. श्रमशक्तीमुळे ती दैनंदिन घरकाम व अर्थोत्पादनाच्या कार्यात कुटुंबाचा आधार असते. श्रमशक्ती व जननक्षमता या गुणवैशिष्ट्यामुळे कुटुंबातील उपयुक्त व्यक्ती बनते.

स्त्रीभ्रूण हत्येची समस्या येते दिसत नाही. मागास समजल्या जाणाऱ्या गडचिरोली जिल्ह्याचे स्त्री-पुरुष प्रमाण हजारामागे १८६ इतके आहे. पुरुष नसबंदीचे प्रमाण येथे पु० टक्के आहे. येथे बालविवाह होत नाहीत. मुली वयात आल्यावरच तिच्या मर्जीनुसार विवाह होतो. कुठलेही दडपण आणले जात नाही. जोडीदाराची निवड करताना गोत्रासंबंधी-च्या (देवानुसार. उदा: सात देव विरुध्द सहा देव) परंपरेचे काटेकोर पालन केले जाते. विवाहानंतर तो संबंध अयशस्वी झाला तर काडीमोड करण्याचा अधिकारही स्त्रियांना आहे. वैधव्य आले तर पुनर्विवाह करता येतो. मृत पतीच्या

मालमत्तेवर तिचा अधिकार असतो.

लग्नात वस्तुमूल्य ही प्रथा अजूनही आहे. वरपित्याने ऐपतीनुसार नाममात्र मूल्य देऊन (कोंबडा, धान्य, दारू, काही रक्कम) वधू घरी आणावी असा हा नियम. वरपक्षाला वधू मिळविण्यासाठी किंमत देणे अशक्य असल्यास तो वधूपित्याकडे काही वर्षे शेतात काम करून त्या मोबदल्यात वधूची मागणी करतो. वधू ही मूल्य देऊन आणली तरी तिला कमी न लेखता तिच्यातील गुणांचा-पात्रतेचा आदर करण्याची भावना त्यामागे आहे. त्यामुळे स्त्रियांनासुद्धा ते प्रतिष्ठेचे वाटते. एखादया मुलीला मुलगा आवडत असल्यास. पण तो लग्नाला तयार नसल्यास मुलगी पाण्याचा हंडा घेऊन सरळ त्याच्या घरात घुसते. लग्नाचा हट्ट करते. दुर्गम भागात अजूनही हे घडते. इतका मोकळेपणा इथल्या स्त्रियांच्या वाटचालीत येतो. लग्नाआ-धीच्या संबंधांतून मूल झाल्यास ते मूल तसेच त्या स्त्रीला पत्नी म्हणून स्वीकारण्या-चा मोठेपणाही हा समाज दाखवितो.

DATE : __/__/__ 15

निष्कर्ष

स्त्रीवाद पुरुषप्रधान समाज व्यवस्थेत स्त्रीला देवता दासी मानले गेले आहे. सामाजिक संकेत आणि मूल्यांच्या नावाखाली तिला 'माणूस' म्हणून स्थान नाकारण्यात आले आहे. तिच्यातील मानवत्व नाकारून तिला वस्तूरूप दिले आहे. स्त्रीला गुलाम म्हणूनच वागविणे कसे योग्य आहे याचे उदात्तीकरण करण्यात आले आहे. स्त्री शोषणास अनुकूल अशी व्यवस्था समाजात निर्माण करण्यात आली आहे. अशा प्रकारच्या लिंग भेदाच्या (Gender Discrimination) विरुद्धची कृतिशील चळवळ म्हणजे स्त्रीवाद.

Scanned with OKEN Scanner

truelines
DATE : _/_/_ 20

संदर्भ

https://deshdootcharity.org.

Scanned with OKEN Scanner

University of Mumbai

Kharepatan Panchakroshi Shikshan Prasarak Mandal, Kharepatan's

ARTS COMMERCE AND SCIENCE COLLEGE, KHAREPATAN

(Affiliated to University of Mumbai - No. ICM / 1 / 558 / 2012 – 13)

Programme : COMMERCE **Academic Year** : 2023-24

Department: COMMERCE **Term:**

Class: S.Y.B.COM. **Semester: III**

Course / Subject : FOUNDATION COURSE **Paper -III**

Sr. No.	Roll No.	Name of The Student	Name of Project Given
1	5301	BELNEKAR PRATIK ARUN	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
2	5302	BHATADE VAISHNAVI MILIND	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
3	5303	BHOVAD AKSHATA RAMDAS	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
4	5304	DALAVI PRANAV SANDIP	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
5	5305	DONGARKAR VINITA VISHNU	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
6	5306	GORULE SONALI CHANDRAKANT	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
7	5307	GOSAVI PRATIKA DATTARAM	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
8	5308	GURAV RUCHITA KAMLAKAR	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
9	5309	HARYAN AJAY ANIL	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
10	5310	JADHAV KOMAL GANGARAM	मानवाधिकार प्रतिबंधक कायदे - संक्षिप्त स्पष्टीकरण
11	5311	JADHAV PRACHI ANIL	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
12	5312	JADHAV RAJ PUNDALIK	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
13	5313	KADAM DIKSHA DINESH	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
14	5314	KARANGUTKAR CHAITALI VILAS	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
15	5315	KARLE SANIKA VIJAY	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
16	5316	KAZI AKSA DILAVAR	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
17	5317	KAZI MAHER HASAN	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
18	5318	KHANVILKAR DIPESH DIPAK	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
19	5319	KONDVILKAR PRIYANKA TUKARAM	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा
20	5320	LAD AMISHA ANIL	मानवी हक्क घटनात्मक प्रतिबंधक तरतुदींचा चिकित्सक आढावा

Scanned with OKEN Scanner

21	5321	MANDAVKAR KARAN TUSHAR	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
22	5322	MANYAR NIKITA SANJAY	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
23	5323	MANYAR PRACHI PRASHANT	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
24	5324	MORE VINITA VIVEK	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
25	5325	NARVEKAR PRABHA VIJAY	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
26	5326	PAGARE TEJAL DIPAK	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
27	5327	PEDNEKAR ARYAN DIPAK	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
28	5328	PETKULKAR DHANANJAY BALKRISHNA	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
29	5329	RAUT SAHIL RATAN	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
30	5330	RAUT SNEHAL MAHESH	महिलांचे उल्लंघन व उपाय योजना सविस्तर पाठपुरावा
31	5331	RAUT VINOD VIDYADHAR	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
32	5332	SARVANKAR SIDDHIKA MANGESH	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
33	5333	SAWANT ABHISHEK AJIT	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
34	5334	SAWANT PRITI PRABHAKAR	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
35	5335	SHELAR RATNAMALA RAVINDRANATH	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
36	5336	SHETYE MRUNMAYI LAVU	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
37	5337	SHIRGAONKAR MUBASHSHIR ABDUL MAJID	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
38	5338	SOLKAR RIDA MUNAWWAR	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
39	5339	SUTAR SUKANYA MURLIDHAR	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
40	5340	TELI PRACHI PRAMOD	आपत्ती व्यवस्थापन कालाची गरज
41	5341	TELI SAYALI SANTOSH	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
42	5342	WAGHARE PRATHAMESH SUHAS	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
43	5343	WAGHU NUZHAT SULEMAN	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
44	5344	WARISE SHUBHAM SUDHAKAR	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
45	5345	ZAPANEKAR YOGINI SHRIDHAR	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा

Scanned with OKEN Scanner

46	5346	ADVILKAR PRASAD PRAKASH	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
47	5347	BANDARKAR VAISHNAVI SHASHIKANT	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
48	5348	BHOVAD MANOJ GANGARAM	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
49	5349	BOBHATE ROHINI RAVINDRA	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
50	5350	CHAVAN GIRISH RAVINDRA	तणाव एक सामाजिक समस्या-सविस्तर आढावा
51	5351	CHAVAN ROSHANI RAMESH	दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका
52	5352	CHAVAN SHUBHAM CHANDRAKANT	दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका
53	5353	DHAMAPURKAR PRATHAMESH MADHUKAR	दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका
54	5354	DHUMAL RUNALI TUKARAM	दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका
55	5355	DONGARKAR RUSHIL DATTARAM	दैनंदिन जीवनातील विज्ञान व तंत्रज्ञानाची भूमिका
